## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०२/२०१७

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन बंदुकीची गोळी फायर करुन एकाचा मृत्यु तर एक गंभिर जखमी केले. :—**

दिंनाक ३०/०१/२०१७ रोजी चे २०.१० ते २०.३० वा. दरम्यान. यातील फिर्यादी अमित उर्फ बाबु अलोक बॅनर्जी वय २८ वर्ष रा. जगनाडे वार्ड तुमसर हा व मृतक हे आपले दोन मित्रासह मोटार सायकलने जिम करून जात असतांना यातील सातही आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी तयार करून २ मोटार सायकल व मारोती ओमनी व्हॅन ने घटणा स्थळी येवुन आरोपी क्र.१ ने फिर्यादीवर बंदुकीने फायर केले परंतु फिर्यादी हा खाली वाकल्यामुळे त्याला गोळी न लागल्याने तो बचावला तसेच आरोपीने फिर्यादीचे अंगावर ओमनी व्हॅन चढविल्याने फिर्यादीचे डावे पायाला किरकोळ जखम झाली व अशा प्रकारे आरोपीने फिर्यादीला जिवे मारण्याचा प्रयत्न केला तसेच आरोपी क्र.२ ने यातील मृतक हेमंत रामरतन ऊईके वय ३८ रा. आंबेडकर वार्ड तुमसर याचे डोक्यावर बंदुकीची गोळी फायर करून तसेच आरोपी पैकी एका अनोळखी आरोपीने मृतकचे पोटावर चाकुने मारून त्याचा खुन करून पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३०२,३०७,१४७,१४८,१४९ भा.द.वि. सहकलम ३,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक शेटे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) विळयाने गळयावर मानेवर व चेहऱ्यावर मारहान करुन जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिंनाक ३१/०१/२०१७ चे १६.०० ते १६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी सुर्यभान चांगु चोपकर वय ६५ वर्ष, रा. कोथुर्णा हल्ली मुक्काम वरठी हा व आरोपी हे एकाच गावचे राहणारे असुन यातील फिर्यादीचा लहान भाऊ चिंधु चांगु चोपकर वय ६८ वर्ष, रा. कोथुर्णा हा एकटाच घरी असतांना यातील आरोपीने अज्ञात कारणा वरुन हातात विळा घेवुन घरात प्रवेश करुन त्यास विळयाने त्याचे गळयावर, मानेवर, व चेहऱ्यावर मारहान करुन जिवानाशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३०७,४५० भादवी. अन्वये येथे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. खंडाते पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) मेटॅयाडोअर चालकांच्या निष्काळजीपणामुळे चिमुकली मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिंनाक ३१/०१/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी आसाराम बालाराम चचाणे वय २८ वर्ष, रा. पांढराबोडी यानी आपली पुतणी मृतक कुमारी रितीका शालीकराम चचाणे वय ०४ वर्ष, हीला रोडाचे बाजुला शौचास बसवुन फिर्यादी हा रोडाचे बाजुला उभा असतांना यातील आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फियादीचे पुतणीस धडक मारुन तिचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३०४(अ) भांदवी सहकलम १८४,१३४(ब) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. ऊईके पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

**४) अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिंनाक २४/०१/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील तीन आरोपीतांनी संगनमत करुन त्यांचे घरचे स्वच्छतालयाचे बांधकामाचे कारणावरुन ग्रामपंचायत कार्यालय खापरी येथील सार्वजनीक ठिकाणी फिर्यादीस अश्लिल शब्दात व मनास लज्जा वाटेल अश्या शब्दात शिविगाळ करुन अंगावर धावुन जिवाने मारण्याची धमकी दिली व तुला जे कोणी सहकार्य करतील त्याच्या मी मर्डर करील अशी धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०९,५०६,३४ भांदवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोन. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहे.

**५) अवैध जुगार /दारू अडयांवर धाडी . :—**

दिनांक ३१/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. लाखांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपीच्या ताब्यातुन ०४ लिटर ६८० मिलीलीटर देशी दारू कि. १३००/—रू माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.